# पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, पुणे

मुख्य कचेरी : ४ ब, बी.जे. रोड, पुणे - ४११००१.

PDCC BANK ✻ पो. बॉक्स नं.१०९ ✻ दुरध्वनी क्र.: २६१३३८३३, २६१३९३००. ई-मेल: ho@pdccbank.com


## ✻ लेखनिक पदाच्या मुलाखतीस पात्र उमेदवारांकरीता महत्वाच्या सुचना ✻

१. लेखनिक पदाच्या ऑनलाईन परिक्षेतील मुलाखतीस पात्र उमेदवारांची मुलाखत यादी (फॉर्म/आसन क्रमांकनिहाय) बँकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

२. मुलाखतीस पात्र उमेदवारांना मुळ कागदपत्र पडताळणी व मुलाखतीसाठीचे मुलाखतपत्र बँकेच्या संकेतस्थळावर उमेदवाराच्या लॉगिन आय.डी.मध्ये उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. याबाबत मुलाखतीस पात्र उमेदवारांना ई–मेल व एस.एम.एस.द्वारे संदेश पाठविण्यात येणार आहेत.

३. उमेदवारांनी स्वतःच्या ऑनलाईन लॉगिन आय.डी.द्वारे मुलाखतपत्र डाउनलोड करावे. मुलाखत पत्रातील नमूद सूचनांचे काटेकोरपणे पालन करून मुलाखतीस निर्धारित वेळेत उपस्थित राहणे बंधनकारक आहे.

४. मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची **मुलाखत दि. १२.०६.२०२६ ते दि. १४.०६.२०२६ या कालावधीत यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), राजभवन कॉम्प्लेक्स, अरमामेंट कॉलनी, बाणेर रोड, राजभवन गणेशखिंड, पुणे युनिव्हर्सिटी, पुणे– ४११००७ या** ठिकाणी आयोजित करण्यात आलेली आहे.

५. मुलाखतीपुर्वी बँकेच्या अधिकाऱ्यांमार्फत उमेदवारांच्या मुळ कागदपत्रांची पडताळणी करण्यात येणार आहे.

६. उमेदवारांना कागदपत्रे पडताळणी करीता खालील कागदपत्रे व प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

| अ.क्र. | तपशील |
|---|---|
| १. | मुलाखतपत्र |
| २. | इयत्ता १०वी (एस.एस.सी.) – गुणपत्रक |
| ३. | इयत्ता १०वी (एस.एस.सी.) – प्रमाणपत्र |
| ४. | इयत्ता १२ वी (एच.एस.सी.)/पदविका (Diploma) – गुणपत्रक |
| ५. | इयत्ता १२ वी (एच.एस.सी.) /पदविका (Diploma) – प्रमाणपत्र |
| ६. | मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी – गुणपत्रक |
| ७. | मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी – प्रमाणपत्र |
| ८. | मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी – गुणपत्रक |
| ९. | मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी – प्रमाणपत्र |
| १०. | एम.एस.सी.आय.टी. किंवा शासन मान्यता प्राप्त संस्थेचे किमान ९० दिवसांचे तत्सम संगणक प्रमाणपत्र (संगणक पदवी असल्यास अट शिथिल) |
| ११. | एच.डी.सी.एम./डी.सी.बी.एम. (असल्यास) – गुणपत्रक व प्रमाणपत्र |
| १२. | जी.डी.सी. ॲन्ड ए. (असल्यास) – गुणपत्रक व प्रमाणपत्र |
| १३. | शासकीय टायपिंग परीक्षा उत्तीर्ण (असल्यास) – प्रमाणपत्र |
| १४. | शासकीय स्टेनोग्राफर परीक्षा उत्तीर्ण (असल्यास) – प्रमाणपत्र |
| १५. | जन्मदिनांकाचा पुरावा – (१० वी प्रमाणपत्र/शाळा सोडल्याचा दाखला) |
| १६. | वय, राष्ट्रीयत्व व अधिवास प्रमाणपत्र (Certificate of Age, Nationality and Domicile) |
| १७. | आधार कार्ड |
| १८. | पॅनकार्ड |
| १९. | विवाह नोंदणी प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र शासनाकडील राजपत्र (विवाहित महीला उमेदवारांसाठी) |
| २०. | इतर शैक्षणिक कागदपत्रे |
| २१. | एक पासपोर्ट साईज कलर फोटो |

२..

७. मुलाखतीच्या दिवशी उमेदवारांनी नमूद केलेल्या कागदपत्रे/प्रमाणपत्रांच्या मुळ प्रती व राजपत्रित अधिकाऱ्यामार्फत प्रमाणित केलेल्या दोन छायांकित प्रतीसह कागदपत्र पडताळणीस निर्धारित वेळेत उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

८. उमेदवारांनी उपरोक्त नमूद केलेली मुळ व प्रमाणित केलेली छायांकित कागदपत्रे/प्रमाणपत्र अनुक्रमांक ६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे अनुक्रमाने फाईल तयार करून पडताळणी अधिकाऱ्यांस सादर करावी.

९. उमेदवारांच्या बायोमॅट्रिक नोंदीची सत्यता पडताळणी मुलाखतीच्या वेळी करण्यात येणार आहे, यासंदर्भातील खालीलबाबींची उमेदवारांनी दक्षता घ्यावी.

८.१. ऑनलाईन परिक्षेच्या वेळी ज्या बोटांचे ठसे दिलेले असतील त्याच बोटांच्या ठशांचे आधारे मुलाखतीवेळी उमेदवाराची सत्यता पडताळणी करण्यात येणार आहे.

८.२. उमेदवाराच्या बोटावर कसलाही थर (शाई, मेहंदी, रंग इत्यादी) असेल तर काढून टाकावा. मुलाखतीच्यापुर्वी सदर थर पुर्णपणे गेलेला आहे याची खात्री करून घ्यावी.

१०. कागदपत्र पडताळणी वेळी उमेदवाराने आवश्यक मुळ कागदपत्रे/गुणपत्रक/प्रमाणपत्र सादर न केल्यास सदर उमेदवारास कागदपत्रे पुनः सादर करण्यास कोणतीही मुदत वाढ दिली जाणार नाही. मुळ कागदपत्रे/प्रमाणपत्र म्हणून छायांकित (झेरॉक्स)/मोबाईल/ऑनलाईन याद्वारे पडताळणीकरीता ग्राह्य धरली जाणार नाहीत.

११. कागदपत्रे पडताळणी वेळी उमेदवार मुळ कागदपत्र/गुणपत्रक/प्रमाणपत्र दाखल न करू शकल्यास मुलाखतीस पात्र राहणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१२. पुणे जिल्ह्यातील मूळ रहिवासी असणाऱ्या उमेदवारांकरीता ७०% पदे राखीव आहेत व उर्वरीत ३०% पदे जिल्ह्याबाहेरील उमेदवारांकरीता खुली आहेत.

१३. पुणे जिल्हयाबाहेरील पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास जिल्हयातील पात्र उमेदवारांमधून सदर पदे भरती करण्यात येतील.

१४. जिल्ह्याबाहेरील विवाहीत महिला उमेदवारांना पुणे जिल्हयातील ७०% राखीव पदांचा लाभ घ्यावयाचा असल्यास सदर महिला उमेदवारांनी पतीचे पुणे जिल्हयातील मूळ अधिवास प्रमाणपत्र दाखल करणे बंधनकारक आहे.

**१५. उमेदवारांनी कागदपत्रे पडताळणी वेळी मूळ अधिवास प्रमाणपत्र (वय, राष्ट्रीयत्व व अधिवास प्रमाणपत्र – Certificate of Age, Nationality and Domicile) दाखल करणे बंधनकारक आहे.**

**१६. कागदपत्रे पडताळणीच्या वेळी उमेदवारांच्या अधिवास प्रमाणपत्रकाची छाननी करण्यात येईल.**

**१७. बँकेने दि. ०७.०८.२०२१ रोजीच्या जाहिरातीमध्ये नमूद केलेली वयोमर्यादा व शैक्षणिक अर्हता दि. ३०.०६.२०२१ रोजीची ग्राह्य धरण्यात येणार आहे.**

**१८. बँकेच्या जाहिरातीत नमूद केलेली वयोमर्यादा किमान २१ वर्षे व कमाल ३८ वर्षे दि. ३०.०६.२०२१ रोजी धारण करणारे उमेदवार मुलाखतीस पात्र राहतील.**

**१९. बँकेच्या जाहिरातीत नमूद केलेली शैक्षणिक अर्हता (कोणत्याही शाखेची पदवी किंवा पदव्यूतर पदवी ५०% गुणांनी उत्तीर्ण असावा व एम.एस.सी.आय.टी./ शासन मान्यता प्राप्त संस्थेचे किमान ९० दिवसांचे तत्सम संगणक प्रमाणपत्र) दिनांक ३०.०६.२०२१ रोजी धारण करणारे उमेदवार मुलाखतीस पात्र राहतील.**

**२०. उमेदवार कागदपत्र पडताळणीस/मुलाखतीस गैरहजर राहिल्यास सदर उमेदवार अंतिम निवडीस पात्र राहणार नाही.**

२१. बँकेने गठित केलेल्या समितीमार्फत उमेदवारांची मुलाखत घेण्यात येईल, मुलाखतीस एकूण १० गुण असून ५ गुण (मौखिक) मुलाखतीसाठी व ५ गुण शैक्षणिक अर्हतेनुसार देण्यात येतील.
सदर शैक्षणिक अर्हतेसाठीचे गुण भारांकन पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेले आहेत.

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | गुणांचे भारांकन |
|---|---|---|
| १ | कोणत्याही शाखेची पदव्युत्तर पदवी | १ |
| २ | विशेष पदवी (बी.कॉम,बी.एस.सी. (ॲग्री) व संलग्न /बी.व्ही.एस.सी. ॲन्ड ए.एच., बी.ई./ बी.टेक. (कॉम्प्युटर/आय.टी.), बी.सी.एस.,बी.बी.ए., एल.एल.बी. ) | १ |
| ३ | एच.डी.सी.एम./डी.सी.बी.एम. | १ |
| ४ | जी.डी.सी. ॲन्ड ए. | १ |
| ५ | ५.१. मराठी टायपिंग शासकीय प्रमाणपत्र धारक (०.५ गुण)<br>५.२. इंग्रजी टायपिंग शासकीय प्रमाणपत्र धारक (०.५ गुण)<br>किंवा<br>५.३. स्टेनोग्राफर शासकीय प्रमाणपत्र धारक (१ गुण)<br>(कमाल गुण १) | १ |
| | **एकूण गुण** | **५** |

२२. उमेदवाराने कागदपत्र पडताळणी व मुलाखतीस स्वखर्चाने वेळेवर उपस्थित राहणे बंधनकारक आहे.

२३. सदर मुलाखत प्रवेशपत्र हे नियुक्ती पत्र नाही. सबब सदर मुलाखत प्रवेश पत्राच्या आधारे उमेदवारास नियुक्ती संदर्भात कोणताही दावा करता येणार नाही.

२४. सरळसेवा भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने बँकेच्या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात आलेल्या महत्वाच्या सूचनांचे अवलोकन करून पालन करावे.

दि. ०२.०६.२०२६

(स्वाक्षरी)
मुख्य कार्यकारी अधिकारी